


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर




वर्ष २८ वे | अंक १८५ | पाने ४ | गुरुवार | दि.७ नोव्हेंबर २०२४ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# कराड उत्तरमध्ये भाकरी फिरवायची वेळ आली

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस:सरकार आले तर कर्जमाफी करणार:पाल येथे मनोजदादा घोरपडेंचा प्रचार शुभारंभ

**उंब्रज/प्रतिनिधी:-**

शरद पवार राजकीय जीवनात आमचे विरोधक आहेत मात्र ते नेहमी एक मंत्र देतात की भाकरी योग्य वेळी फिरवली नाही तर ती करपते. आता पवार साहेबांना सांगा उत्तर कराड मधील तुमची भाकरी फिरवायची वेळ आली आहे. मनोज दादा आता हे नुसते उमेदवार नाहीत तर ते कराड उत्तरच्या परिवर्तनाचा जबरदस्त चेहरा आहेत त्यांना विधानसभेत पाठवा पाचच वर्षात २५ वर्षाचा बँकलॉग भरुन काढतो. आपल्या आशिर्वादाने सरकार आले तर कर्जमाफीही करतो असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार मनोजदादा घोरपडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ पाल ता. कराड येथे मल्हारी म्हाळसाकांत यांच्या साक्षीने उपमुख्यमंत्री यांनी श्रीफळ वाढवून केला. त्यानंतर आयोजित सभेत त्यांनी शरद पवारांसह महाविकास आघाडीवर टीका केली. यावेळी खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे, विधान परिषदेचे आमदार सदाभाऊ खोत, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, रामकृष्ण वेताळ, अशोकराव गायकवाड तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



पालयेथे खंडोबाचे दर्शन घेताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस .

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या जडणघडणीत कराडला ऐतिहासिक महत्त्व आहे. दुर्दैवाने गेल्या पंचवीस वर्षात उत्तर कराड ज्या प्रकारे विकासाची अपेक्षा ठेवतो, ज्या प्रकारे परिवर्तनाची अपेक्षा ठेवतो ती अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही.वारंवार तुम्ही येथून जो लोकप्रतिनिधी पाठवता त्यांच्याकडून ही अपेक्षा पूर्ण होताना दिसत नाही. उत्तर कराडमध्ये मनोज दादा, धैर्यशील दादा आणि रामकृष्ण वेताळ यांच्यात होणारी मत विभागणी टाळण्यासाठी आपण एकत्र आलो. यामध्ये कुणाला तरी त्याग करावा लागला मात्र सर्वांनी मिळून मनोजदादांचे नाव पुढे केले पण मनोजदादा आता हे नुसते उमेदवार नाही तर कराड उत्तरच्या परिवर्तनाचे जबरदस्त चेहरा आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. महायुती विकासाच्या बाबतीत निधी देण्यात कुठेही मागे पडणार नाही. अनेक जिल्ह्यातील दुष्काळी चेहरा पुसून सिंचन योजना राबविल्या आहेत. या परिसरातील मागणीचा विचार करुन तारळीचे पाणी शंभर मीटर हेड करून प्रत्येकाच्या शेतीपर्यंत पाण्याचा थेंब थेंब देण्याचे काम आम्ही करू, कराड उत्तरच्या कार्यकर्तांनी आमदार नसताना मतदार संघात ९९० कोटी रुपयांचा विकास निधी आणला. ते सत्तेत आले तर पाच वर्षात २५ वर्षाचा बॅकलॉग भरून काढतील. सोबतीला खासदार उदयनराजे आहेतच त्यांच्या एका शब्दावर पंतप्रधान मोदीजी तिजोरी खुली करून देतील. महायुती सरकारने जिल्ह्यातील विविध प्रकल्पांना सिंचनासाठी दहा हजार कोटी दिले आहेत. शेतकऱ्यांचे विज बिल माफ केले आहे. तर येणाऱ्या पाच वर्षाची बिल माफ होतील. पुढील दोन वर्षानंतर राज्यात २४ तास ३६५ दिवस शेतकऱ्यांना वीज मिळणार आहे. शेतकऱ्यांना रात्री पाणी पाजण्याचा त्रास यापुढे होणार नाही. शेतकऱ्यांच्या अतिरिक्त उत्पन्नावर आकारण्यात येणारा इन्कम टॅक्स यापुढे लागणार नाही. आपल्या आशीर्वादाने सरकार आले तर शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.




भाजपा महायुतीचे उमेदवार मनोजदादा घोरपडे यांच्या प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समोर उपस्थित जनसमुदाय.


# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची शुक्रवारी विंग येथे जाहीर सभा

**कराड/प्रतिनिधी:-**

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारताचे केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री ना. अमित शाह शुक्रवारी (ता. ८) कराडच्या दौऱ्यावर येत आहेत. विंग येथील आदर्श विद्यामंदिराच्या भव्य पटांगणावर ना. अमित शाह यांची तोफ धडाडणार आहे.

राज्यातील निवडणुकांच्या रणधुमाळीला जोरदार प्रारंभ झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री ना. अमित शाह, केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांच्यासह मान्यवर नेत्यांच्या प्रचारसभांचा धडाका महाराष्ट्रात सुरु होत आहे. याअंतर्गत केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शाह यांची कराड येथे भव्य प्रचार सभा होत आहे.

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आर.पी.आय. व मित्रपक्षांच्या महायुतीचे कराड दक्षिणमधील उमेदवार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रचारार्थ विंग (ता. कराड) येथील आदर्श विद्यामंदिराच्या पटांगणावर शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



या सभेत केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शाह उपस्थितांना संबोधित करणार आहेत. याप्रसंगी सभेच्या व्यासपीठावर जिल्ह्यातील विविध मान्यवरांची मोठी उपस्थिती असणार आहे. या सभेला कार्यकर्ते, नागरिक, मतदार व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपाचे तालुकाध्यक्ष पैलवान धनंजय पाटील यांनी केले आहे.

# राहुल यांनी दिल्या मविआच्या ५ गॅरंटी

## महिलांना दरमहा ३ हजार,तरुणांना ४ हजार;जात जनगणनेचे आश्वासन

**मुंबई/प्रतिनिधी:-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय पक्षांची आता प्रचार सभा पार पडली सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई येथील बीकेसी मैदानावर महाविकास आघाडीची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्वच नेते उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा व खासदार वर्षा गायकवाड यांनी भाषण केले. यावेळी वर्षा गायकवाड यांनी महिलांवरील होणाऱ्या अत्याचारांवर भाष्य करत महायुती सरकारवर टीका केली आहे. महाविकास आघाडीची सरकार पुन्हा येणार, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महाविकास आघाडीची पंचसूत्री जाहीर
१. जातीनिहाय जनगणना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटवणार.
२. कुटुंब रक्षण - २५ लाखांपर्यंत आरोग्य विमा देणार.
३. महालक्ष्मी योजना महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देणार
४. युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांना महिन्याला ४ हजार रुपये देणार.
५. शेतकऱ्यांना कर्जमाफी नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३ लाखांपर्यंत कर्जमाफी.




# ओगलेवाडी घरफोडी प्रकरणी दोघांना अटक

**कराड/प्रतिनिधी:-**

ओगलेवाडी येथील घरफोडी प्रकरणात कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने दोघांना अटक केली असून त्याच्याकडून ८८ तोळे सोन्याचे दागिने व रोख एक लाख रूपये रक्कम असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दोघांना बुधवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

विनायक काळे (वय ४६), सिद्धांत भोसले (वय २३) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ओगलेवाडी (ता. कराड) येथील उद्योजक कै. वसंत दिनकर खाडे यांचे बंद घर फोडून घरातील १०९.५ तोळे सोन्याचे दागिने व रोख दिड लाख रूपयांची रक्कम अज्ञात चोरटयांनी लांपास केल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. याबाबत प्रतीक वसंत खाडे यांनी कराड शहर पोलिसांत फिर्याद दाखल केली होती.

घटनास्थळी डीवायएसपी अमोल ठाकूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू ताशिलदार यांनी भेट देऊन गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर यांना तपासाच्या सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने अशोक भापकर व त्यांच्या टीमने बंगल्याच्या आवारातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. गतीने तपासाची चक्रे फिरवत विनायक काळे व सिद्धांत भोसले या दोघांना खटाव तालुक्यातील तडवळे येथून ताब्यात घेतले.

# रामराजेंना विचारणा करणार:अजितदादा

**फलटण/प्रतिनिधी:-**

फलटण-कोरेगाव विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये लढत होताना पाहायला मिळते. परंतु अजितदादांच्या गटात असलेले रामराजे निंबाळकर हे प्रचारात दिसत नसल्याचं चित्र पाहायला मिळते. त्यावर रामराजे नाईक निंबाळकर यांना नोटीस पाठवण्यात येईल असं अजित पवार म्हणालेत.



रामराजे नाईक निंबाळकर हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असले तरी फलटणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रचार ते करत नसल्याची चर्चा आहे. त्यानंतर अजित पवारांनी नोटीस पाठवणार असल्याचे सांगितले. रामराजे यांचे दोन्ही बंधू, संजीवराजे नाईक निंबाळकर आणि रघुनाथराजे नाईक निंबाळकर यांनी तुतारी हाती घेतली आहे.

# लाडक्या बहीणीचे पैसे २१०० रुपये करणार

## राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध

**पुणे/प्रतिनिधी:-**

निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात पक्ष आपले जाहीरनामे प्रसिध्द करत आहेत, अशातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचा आज जाहीरनामा प्रसिध्द होत आहे. यामध्ये लाडक्या बहिणींसाठी मोठा वादा केला आहे. आता लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्यात येईल असं सांगण्यात आलं आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे १५०० वरून २१०० रुपये करणार असल्याचं जाहीरनाम्यामध्ये सांगण्यात आलेलं आहे.

जाहीरनामा प्रसिध्द करताना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, महायुती सरकार काळात जे काम केलं ते लोकांपर्यंत घेऊन चाललो आहोत. आम्ही काही बदल करणाऱ्या योजना मागच्या ४ महिन्यात केल्या आहेत. लाडकी बहीण योजना, आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणासाठी पैसे अशा अनेक योजना जाहीर केल्या. याला प्रचंड प्रतिसाद देखील मिळत आहे. तालुका स्तरीय देखील जाहीरनामा प्रसिद्ध करत आहोत. स्थानिक पातळीवरील जाहीरनामा यामध्ये आमदारांच काम मांडलेले असेल. आम्ही सुरू केलेल्या हेल्पलाइनला २५ लाख कॉल आले आहेत. लाडकी बहीण योजेनच्या पैशात वाढ करत आहोत. ती आम्ही २१०० रुपये करणार आहोत. २ कोटी ३० लाख महिलांना याचा लाभ मिळणार आहे.

शेतकरी सन्मान योजना आम्ही १५ हजार रुपये करणार आहोत. कर्जमाफी आणि अतिरिक्त अनुदान आम्ही देणार आहोत. २० टक्के अधिक अनुदान असेल. राज्यातील ग्रामीण भागात ४५ हजार पानंद रस्ते करणार आहोत, असं राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीरनाम्यात सांगण्यात आलं आहे.




## जाहीरनामा..

धुम धडाक्यात करे
जाहीरनामा जाहीर
तीव्र दुष्काळ आला
चला खोदूया विहीर
कसे रेखाटू मृगजळ
चाणाक्य तो माहीर
मतदाता व्याकुळला
झालाअगदी काहीर
अमूक तमूक देणार
उदार कर्ण ते अधीर
पुण्य घ्यायचे उधार
सुटत चाललायं धीर
भक्ती भावा पुळका
गुलालउधळाअबीर
करूणा दया भाका
हलवा खांबा खंबीर
युतीआघाडी हलली
कार्यकर्ते हो अस्थिर
शब्दांच्या पायावरती
सरकार देऊ सुस्थीर
निवडणूकी जिंकता
किती असालं गंभीर
पाला पाचोळा उडेलं
आश्वासनी भीर भीर


**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# अमेरिकेत फिर एक बार ट्रम्प सरकार

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था:-**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर ४ वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा निवडणूक जिंकणारे ट्रम्प हे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. ट्रम्प २०१६ मध्ये पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष झाले. २०२० च्या निवडणुकीत ते जो बिडेन यांच्याकडून पराभूत झाले. १३२ वर्षांपूर्वी, ग्रोव्हर क्लीव्हलँड दोनदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. १८८४ आणि १८९२ च्या अध्यक्षीय निवडणुका त्यांनी ४ वर्षांच्या अंतराने जिंकल्या. कमला हॅरिस या निवडणुकीत विजयी झाल्या असत्या तर त्यांनी पहिल्या महिला राष्ट्रपती बनून इतिहास रचला असता. त्या सध्या अमेरिकेच्या उपराष्ट्रपती आहेत.

अमेरिकेतील ५३८ जागांपैकी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला २७७ जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी २७० जागांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर कमला हॅरिस यांच्या पक्षाने २२४ जागा जिंकल्या आहेत. दोघांमध्ये केवळ ४३ जागांचा फरक आहे. मात्र, उर्वरित सर्व ५ राज्यांमध्ये ट्रम्प आघाडीवर आहेत. अशा परिस्थितीत चुरशीची लढत देऊनही कमला यांचा निवडणुकीत पराभव झाला आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहे, सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हसाठीही निवडणुका झाल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाला सिनेटमध्ये बहुमत मिळाले असून हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये आघाडीवर आहे.



विजयानंतर अमेरिकन जनतेला संबोधित करताना ट्रम्प म्हणाले की, मी अमेरिकेला पुन्हा एकदा महान बनवणार आहे. या दिवसासाठीच देवाने माझा जीव वाचवला होता. ट्रम्प यांच्यावर १३ जुलै रोजी पेनसिल्व्हेनियामध्ये हल्ला झाला होता. एक गोळी कानाला लागली आणि बाहेर गेली. या हल्ल्यात त्यांचा जीव थोडक्यात बचावला.

निवडणुकीत विजय निश्चित झाल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकेतील जनतेचे आभार मानले आहेत. ते म्हणाले की, लोकांना जे अशक्य वाटले ते आम्ही केले. देशाचे सर्व प्रश्न मी सोडवणार आहे. अलास्का, नेवाडा आणि ॲरिझोनामध्ये जिंकणे माझ्यासाठी मोठे आहे. हे अविश्वसनीय आहे. ट्रम्प म्हणाले की, मी अमेरिकन लोकांच्या कुटुंबासाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी लढणार आहे. पुढील ४ वर्षे अमेरिकेसाठी महत्त्वाची आहेत. अमेरिकेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा विजय असल्याचे ट्रम्प म्हणाले. टेस्ला प्रमुख एलॉन मस्क यांचे कौतुक करताना ट्रम्प म्हणाले की, तो एक स्टार आहे. निवडणुकीच्या प्रचारात ते रॉकेटप्रमाणे उडून गेले आहेत.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहे, सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हसाठीही निवडणुका झाल्या आहेत. यामध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाने सिनेट म्हणजेच वरिष्ठ सभागृहात विजय मिळवला आहे. त्यांना ९३ पैकी ५१ जागा मिळाल्या. बहुमतासाठी ५० जागांची गरज होती. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्येही रिपब्लिकन आघाडीवर आहेत. काँग्रेसचे कनिष्ठ सभागृह असलेल्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये डेमोक्रॅट्सना १३३ तर रिपब्लिकनला १७४ जागा मिळाल्या आहेत. यात ४३५ सदस्य आहेत, त्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा आहे. ट्रम्प ४ वर्षांनी व्हाईट हाऊसमध्ये परतणार आहेत. ते २०१७ ते २०२१ पर्यंत राष्ट्रपती होते.

न्यूयॉर्क टाइम्सच्या रिपोर्टनुसार, डोनाल्ड ट्रम्प जेव्हा ३ वर्षांचे होते, तेव्हा त्यांनी त्यांच्या वडिलांच्या व्यवसायातून वार्षिक २ लाख कमावण्यास सुरुवात केली. ट्रम्प ८ वर्षांचे झाले तोपर्यंत ते करोडपती झाले होते. ट्रम्प अडीच वर्षांचे असताना त्यांची आई आजारी पडू लागली. यामुळे ट्रम्प यांच्या वडिलांचा त्यांच्या संगोपनावर मोठा परिणाम झाला. ट्रम्प यांची भाची मेरी सांगते की डोनाल्ड जेव्हा मोठा होत होता तेव्हा त्याला त्याच्या आईचे प्रेम मिळाले नाही. ट्रम्प यांचे चरित्रकार मार्क फिशर म्हणतात की जेव्हा जेव्हा कोणी ट्रम्प यांना विचारते की त्यांची आई त्याच्यावर कशी प्रेम करत होती, तेव्हा ट्रम्प यांच्याकडे उत्तर नसते.

# साताऱ्यात पारंगे चौकात वाहनांचा तिहेरी अपघात

**सातारा/प्रतिनिधी:-**

साताऱ्यातील पारंगे चौकात बुधवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास विचित्र तिहेरी अपघात झाला. हा अपघात एसटी, कार व ट्रॅव्हल्स झाला असून रात्री उशीरापर्यंत सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

याबाबत प्राथमिक माहिती अशी, एसटीची कारला धडक बसली. यामुळे कार थेट तेथे असलेल्या ट्रॅव्हल्सला धडकली. अपघातात कार व ट्रॅव्हल्सचे नुकसान झाले. सुदैवाने अपघातात कोणी जखमी झाले नाही. मात्र अपघातानंतर परिसरात सर्वांचीच घाबरगुंडी उडाली. अपघातानंतर हे प्रकरण सातारा शहर पोलिस ठाण्यात आले असून पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

# आर्थिक लाभाच्या अमिषाने सुमारे चार लाखांची फसवणूक

**सातारा/प्रतिनिधी:-**

आर्थिक लाभाच्या अमिषाने सुमारे चार लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अनोळखी मोबाईलवर लिंक पाठवून द्वारे टास्क देवून पैसे मिळतील असे सांगून तब्बल ४ लाख १२ हजार १०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञातावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी अमित संपत फाळके (वय ३९, रा.शाहूनगर, सातारा) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. २० ऑक्टोबर रोजी घडली आहे.

दुर्जनाला वेदांतात बुडवले तरी त्याला सुजनत्व येत नाही. – अज्ञात

# संपादकीय

## हिरवे सोने!

नारळाप्रमाणेच बांबूला बहुगुणी वनस्पती म्हणून ओळखले जाते. हिरवं सोनं म्हणून बांबूची ओळख करून दिली जाते. बांधकाम क्षेत्रापासून ते विविध वस्तू उत्पादनापर्यंत आणि कागदापासून ते फर्निचरपर्यंत अशा अनेक ठिकाणी बांबूचा वापर केला जातो. यामुळे बांबूला दिवसेंदिवस वाढती मागणी आहे. या पार्श्वभूमीवर बांबू लागवडीकडे शेतकऱ्यांनी पर्यायी पीकपध्दती म्हणून गांभीर्याने पाहावे. हिरवं सोनं म्हणून बांबूची ओळख करून दिली जाते. तृणवर्गीय बहुवर्षीय पर्यायी पीकपध्दती म्हणून बांबू लागवडीकडे पाहण्याची गरज सध्या निर्माण झाली आहे. बांधकाम क्षेत्रात आवश्यक असलेल्या लाकडाला पर्याय म्हणून बांबूकडे पाहिले जात असताना त्याची मागणीही वाढत चालली असून शेतीमध्ये शाश्वत उत्पन्नासाठी बांबू लागवडीकडे पाहिले जात आहे. बहुवर्षीय पीक असल्याने आणि बदलत्या वातावरणाबरोबरच रोगराईचा धोकाच नसल्याने शेतकऱ्यांनी आता बांबू लागवडीकडे वळण्याची गरज आहे. एक वेगळा प्रयोग म्हणूनही याकडे पाहिले पाहिजे.मानवी जीवनात खाद्यान्न म्हणून ज्याचा उपयोग प्रामुख्याने केला जातो ती सर्व पिके तृणवर्गीय आहेत. ज्वारी, मका, बाजरी, गहू ही मुख्य पिके एक प्रकारे गवताचाच प्रकार आहे. याचबरोबर ऊसही गवतच म्हणून ओळखले जाते. याच पध्दतीने बांबूसुध्दा एक गवताचाच प्रकार आहे. अनादी काळापासून या बांबूचा वापर प्रामुख्याने घरासाठी केला जात आहे. झोपडी बांधण्यापासून ते आधुनिक काळातील बांबू हाऊसपर्यंत बांबूचा वापर केला जात आहे. याशिवाय घरामध्ये वापरण्यात येत असलेल्या बैठक व्यवस्थेसाठीही बांबूचा वापर केला जात आहे. तसेच बांबूच्या कोवळ्या कोंबाचा वापर भाजीसाठी आणि लोणच्यासाठीही करण्यात येतो. बांधकाम क्षेत्रात बांबूचा वापर अमर्याद पध्दतीने केला जातो. तसेच इंधन निर्मितीबरोबरच कागद उद्योगामध्येही बांबूचा वापर होत असल्याने बाजारातील बांबूची मागणी वाढतच आहे. आजच्या घडीला बांबू उद्योगातील देशांतर्गत उलाढाल २५ हजार कोटींची आहे. बांबू हे जलदगतीने वाढणारे काष्ठ गवत आहे. माणगा बांबू अशी याची ओळख असली तरी राज्यात चिवा, माणगा, कर्नाटकात सिमे, बिदूर गोव्यात कोंडवा तर केरळमध्ये ओविये या स्थानिक नावाने बांबूला ओळखले जाते. उष्ण दमट प्रदेशात याची वाढ चांगली होत असली तरी नैसर्गिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता उपजतच असल्याने पाण्याचा निचरा होणाऱ्या काळ्या, लाल मातीतही बांबूची उपज चांगली होते. पाणलोट, पाणस्थळ जमिनीवर सागरी किनारपट्टीत याची लागवड लाभदायी ठरते. शेताला नैसर्गिक सजीव कुंपन म्हणूनही याची लागवड करता येते. यामुळे पर्यावरण संतुलनालाही चांगली मदत होते. हवेतील प्राणवायूचे प्रमाण वाढण्यासाठी बांबू लागवडीची मोलाची मदत होते. बांबूमधील माणगा ही प्रजाती काटेविरहीत, सुटसुटीत काठ्या यामुळे प्राधान्याने या जातीचा उपयोग लागवडीसाठी केला जातो. याची उंची दहा ते बारा मीटरपर्यंत असते, टोकाशी सरळ, जास्त फांद्या नसलेले ताठ, मजबूत आणि भरीवपण असतो तर पेरातील अंतर पंधरा ते ३० सेंटीमीटर आणि व्यास अडीच ते सहा सेंटीमीटर असतो. बांबू लागवड पावसाळ्यात जून–जुलै महिन्यात किंवा सिंचन सुविधा असेल तर नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये केली तर चालते. ३ बाय ३ मीटर किंवा १० बाय १० मीटरवर लागवड केली तर खरीप व रब्बी हंगामाची पिके घेता येतात. लागवडीसाठी दोन बाय दोन फुटाचा खड्डा काढून पाच ते दहा किलो शेणखत अथवा गांडूळ खत १०० ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश यांचे मिश्रण घालावे, तसेच बुरशीनाशक, वाळवी नाशकाचा वापर करून तयार रोपे लावावीत. गरजेनुसार दोन वेळा खुरपणी करावी. आठवड्यातून एकवेळ पाणी द्यावे. बांबूची काढणी कोंब आल्यानंतर तिसऱ्या वर्षापासून करता येते, मात्र पूर्ण वाढ होण्यासाठी चार वर्षे वाट पाहावी लागते. त्यापुढे तसाच बांबू ठेवला तर ठिसूळपणा वाढण्याचा धोका असतो. चांगली देखभाल असलेल्या बेटाकडून तीन चार वर्षानंतर सरासरी आठ ते दहा बांबू मिळतात, तर पाच ते पंधरा काठ्या मिळतात. आजच्या बाजारभावाने प्रत्येक काठीचा दर ५० रुपयांच्या पुढे आहे. एक एकर बांबू लागवडीपासून दर वर्षी ७० ते ८० हजाराचे उत्पन्न मिळू शकते. तसेच बांबू मिशनने बारपूर इंडस्ट्रीशी केलेल्या करारानुसार बांबू खरेदीसाठी शाश्वत बाजारपेठ असून या ठिकाणी साडेतीन हजार रुपये प्रतिटन दर निश्चित करण्यात आला आहे. बहुवर्षीय पीक असल्याने उत्पन्न दरवर्षी मिळते. एकदा लागवड केली की दर वर्षी मशागत, पेरणी, मेहनत, मजुरी यावर खर्च करावा लागत नाही.बांबू लागवड बिया, शाकीय, कंदाद्वारे, उतिसंवर्धित रोपाद्वारे केले जाते. शाकीय प्रजननसाठी कंद, खोड, फांदी याचा वापर करता येतो. सामाजिक वनीकरण विभागाकडून शाकीय पध्दतीचा प्रामुख्याने वापर रोपनिर्मितीसाठी केला जातो.गृहबांधणीसाठी नैसर्गिक साधनांचा वापर वाढत चालला असून पर्यावरणपूरक म्हणून बांबूचा वापर वाढताच राहणार आहे. यामुळे बांबू लागवडीला भविष्यात चांगली बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. हे ओळखून शेतीसाठी सजीव कुंपन म्हणून बांबूची लागवड एक शाश्वत उत्पन्नाचा स्रोत म्हणून याकडे पाहिले पाहिजे. आटपाडी तालुक्यात यावर्षी एक हजार एकर क्षेत्रावर बांबू लागवड केली जाणार आहे.

## बोधकथा


### चित्रकाराचा सन्मान

भोजराजाच्या आश्रयाला अनेक नाट्य कलाकार, संगीततज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार येत असतात. तो त्यांचा यथोचित आदर करी नि भरपूर धन देऊन सन्मानाने परत पाठवी. चित्रकार शिवशर्मा एकदा शेषनागाने एक अप्रतिम चित्र तयार केले. नंतर स्वत: ते चित्र राजदरबारात आणून राजाला भेट म्हणून त्याने अर्पण केले. 'वा! फारच छान आहे चित्र आहे हे आपले.' राजा कौतुकाने म्हणाला व आपल्या पद्धतीप्रमाणे दहा हजार मोहोरांची देणगीही जाहीर केली. पण शिवशर्मा केवळ चित्रकारच नव्हता. तो उत्तम कवीसुद्धा होता. चटकन तो बोलून गेला, 'महाराज, बेडकांना भक्षण करणारे नाग जागोजागी दिसतात. पण पृथ्वीचा भार सोसणारा एक शेषनागच बरं.' शेषनागाच्या उदाहरणातून सर्वांना आश्रय देणाऱ्या भोजराजाची त्याने केलेली ती स्तुती आणि त्याचबरोबर गोरगरीबांना पिळणाऱ्यांची केलेली निंदा चतुर राजाच्या लक्षात आल्यावाचून कशी राहील? संतुष्ट होऊन आणखी पंचवीस हजार मोहोरा त्याने शिवशर्माला दिल्या. राजदरबारातल्या इतर काही चित्रकारांना ही गोष्ट अर्थातच रुचली नाही. त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल एवढे मोठे बक्षीस कदापि मिळाले नव्हते. राजाला त्यांच्या चेहऱ्याची नाराजी चटकन समजली व तो म्हणाला, 'मित्रांनो, चित्रकला नि काव्यकला यांचा अजोड संगम झालाय शिवशर्मात. दुग्धशर्करायोग. मणिकांचन योग म्हणतात तो यालाच बरे!' इतर चित्रकारांनीही मग शिवशर्माचा मोठेपणा मान्य केला आणि भोजनाच्या दरबारात आणखी एक नवरत्नाची भर पडली.

कथा उपदेश : अंगात गुण असले की कधी कधी तरी त्याचे चीज होते.

# राजकीय फेरमांडणी





मनोहर सप्रे
पुणे

सध्या मी जरा जास्तच लिहितो आहे असे वाटू शकेल, पण महाराष्ट्रातील आभासी राजकारणात नेमके काय घडू शकते याचा अंदाजघ्यावा असा माझा हेतू. सध्या वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्या किंवा वाहिन्यांवर सुरु असलेली चर्चा बरीच करमणूक करणारी आणि दुर्लक्ष करावी अशीच असते. मी लिहितो तेही दुर्लक्ष करावे या सदरात मोडते. पण मी समोर दिसते ते मांडण्याचा प्रयत्न करतो. अनेकांना ते पटत असावे. अमेरिकेत राहणारे किंवा तिथे गेलेले काही मित्र सकारात्मक प्रतिक्रिया देतात तेव्हा हे पटते.

तर या निवडणुकीत दोन शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेस लढतीत आहेत. या दोन पक्षांना एकत्रित लढले तेव्हा मिळालेल्या एकूण जागा होत्या ११०. आता मूळच्या या दोन पक्षांच्या चार भागांमध्ये अस्तित्वाची लढाई सुरु आहे. यापैकी एकही पक्ष चाळीस पेक्षा अधिक जागा जिंकेल अशी परिस्थिती नाही. चारपैकी दोन पक्षांच्या बाजूला जनमत गेले तरीही पन्नास च्या घरात एखादा पक्ष जागा जिंकू शकतो. या पक्षाच्या नेत्याला मुख्यमंत्री होण्याची संधी असेल तर ती फक्त एकनाथ शिंदे यांना आहे. अजित पवार यांच्या बरोबर आलेल्या ४० आमदारांपैकी किती निवडून येतात हे औत्सुक्य आहे. त्यावर मी भाकित करणे योग्य नाही. अशा परिस्थितीत जर एखाद्या आघाडी किंवा युतीची लाट असेल तरीही या चार पक्षांपैकी कोणताही पक्ष आपल्या तालावर मित्रपक्षांना नाचवू शकेल अशी परिस्थिती नाही. मी हे लिहिण्याचे कारण म्हणजे चारही पक्ष शंभर पेक्षा कमी जागा लढवीत आहेत. पवार यांच्या पक्षाने लोकसभेच्या लढवलेल्या १० पैकी ८ जागा जिंकल्या म्हणून विधानसभेच्या ९० पैकी ७२ म्हणजे ८०%, जागा जिंकतील हा भाबडा आशावाद आहे.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे काँग्रेस पक्षाचे नेतृत्व तिकडे प्रियंका वड्रा यांचे वायनाडमध्ये काय भवितव्य आहे या चिंतेत आहे. झारखंडमध्ये पक्ष फक्त तंबूला टेकू देण्याचे काम करीत आहे. परिणाम असा झाला आहे की राहुल गांधी यांना महाराष्ट्रात यावे किंवा नाही असा प्रश्न पडला आहे. गावात चार नातलग असले म्हणजे नेमके कोणाकडे उतरावे असा प्रश्न पाहुण्यांना पडतो तशी परिस्थिती आहे. महाराष्ट्रात पक्षाचा प्रमुख नेता कोण हाच मोठा प्रश्न आहे. काँग्रेसला चांगली कामगिरी करण्याची आशा होती, पण शंभर च्या आसपास जागा लढवून जिंकणार किती हा मोठा प्रश्न. लोकसभा निवडणुकीत १७ लढवून १३ जिंकल्या म्हणजे शंभर पैकी ७८ जिंकणार असे होत नाही. म्हणजे काँग्रेस फारतर ६० च्या आसपास राहू शकते. मागे मी म्हटले होते की ६०/४०/४० असे काही होऊ शकते. पण यात वीसपंचवीस जागांची घट झाली की गाडी सव्वाशे वर आली.

म्हणजे विधानसभा निवडणूक झाल्यानंतर सगळ्या पक्षांमध्ये भगदड सुरु होईल आणि मग एक लोकप्रिय वाक्य पुन्हा ऐकू येईल.

आम्हाला सर्व पर्याय खुले आहेत म्हणजे २३ नोव्हेंबरपासून महाराष्ट्रात नव्याने राजकीय फेरमांडणी सुरु होईल असा माझा अंदाज आहे. आणि त्याची सुरुवात महाराष्ट्रात काही काळासाठी राष्ट्रपती राजवट येऊन होऊ शकते. उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ संपली आणि छाननी सुरु झाली तरी उमेदवारांची अंतिम यादी नाही अशी शोकांतिका महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात घडत आहे.

एका बाजूला काही घटक मोठी आर्थिक प्रगती करीत आहेत, दुसरीकडे शेतीत नव्या पिढ्या धडपड करीत आहेत. शहरांमध्ये उंचच उंच इमारती उभ्या रहात आहेत. महागडे मोबाईल, सोन्याचे दागिने, मोटारी, दुचाक्या यांची खरेदी होत आहे. पण दुसरीकडे प्रशासन नावाची यंत्रणा नेमकी कशी असेल या चिंतेत महाराष्ट्राची जनता आहे. अनेक पक्ष ,आघाड्या, वैयक्तिक महत्वाकांक्षा असे सगळे सुरु आहे. अशी परिस्थिती निसर्गात निर्माण होते तेव्हा वादळ प्रकटते आणि सगळे घुसमळून निघते. तशीच परिस्थिती महाराष्ट्रात आहे. निवडणूक संपली की सुरु होईल राजकीय फेरमांडणी. दोन नेते बुद्धीबळ स्पर्धेचे उदघाटन करताना नको ते प्यादे उचलतात आणि आजूबाजूला संयोजक हाताच्या घड्या बांधून बघत असतात तशी जनतेची परिस्थिती आहे.

# कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमी सहस्त्रार्जुन महाराज जन्मोत्सव



रमेश लांजेवार
नागपूर

सहस्त्रार्जुन जन्मोत्सव कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जाते. सहस्त्रार्जुन क्षत्रिय चंद्रवंशीय राजा होते. सहस्त्रार्जुनचा जन्म महाराज हैह्यवंशातील १० वी पीढीतील माता पद्मिनी यांच्यापासुन झाला. जन्मनाव एकवीर होते. चंद्रवंशाचे महाराज कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे त्यांना कार्तवीर्य–अर्जुन संबोधल्या जात होते.कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे कार्तवीर्यार्जुन या नावाने सुध्दा ओळखले जावु लागले.कार्तवीर्याजुन यांनी आपल्या आराधनेच्या माध्यमातून भगवान दत्तात्रेय यांना प्रसन्न केले. त्यामुळे भगवान दत्तात्रेय यांनी युध्दाच्या वेळी कार्तवीर्यार्जुन यांना हजार हाताचे बळ प्राप्त करण्याचे वरदान दिले. त्यामुळे त्यांना सहस्त्रार्जुन संबोधल्या जावु लागले. यांनाच सहस्त्रबाहु अर्जुन सुध्दा म्हणतात. सहस्त्रार्जुन (सहस्त्रबाहु) यांची कथा ग्रंथ महाभारतासह अनेक वेदांसोबतच संपूर्ण पुराणांमध्ये सुध्दा दिसून येते.भगवान विष्णु आणि माता लक्ष्मी यांच्या सोबतच सहस्त्रार्जुन यांच्या कथेचे वर्णन भागवत पुराणमध्ये पहायला मिळते. देवतांच्या अनेक अवताराप्रमाणे सहस्त्रार्जुन महाराज हे भगवान विष्णूचे २४ वे अवतार माणल्या जाते.सहस्त्रार्जुन महाराज यांच्या नावाने सुध्दा पुराण व संग्रह दिसून येते. सहस्त्रार्जुन महाराज यांच्या पुराणांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहे. सहस्त्रार्जुन महाराज यांचे जन्म नाव एकवीर होते.ते कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे कार्तवीर्य व अर्जुन तथा सहस्त्रभुजा असल्याचा वरदान असल्यामुळे सहस्त्रार्जुन या नावाने ओळखल्या जाते. भारतातील संपुर्ण कलार, कलाल, कलवार, कलचुरी समाज स्वत:ला सहस्त्रार्जुन महाराजांचे वंशज आहेत. त्यामुळे कलार, कलाल, कलवार, कलचुरी समाज अनेक राज्यांमध्ये सहस्त्रार्जुन महाराजांचा जन्मोत्सव कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला दिपोत्सवाप्रमाणे मोठ्या थाटाने व उत्साहाने साजरी करून पुजा–अर्चना करतात. मध्यप्रदेशमध्ये सहस्त्रार्जुन महाराजांच्या जन्मोत्साला सार्वजनिक सुट्टी सुध्दा असते. सहस्त्रार्जुन (सहस्त्रबाहु) हे दानी, विद्वान, महाग्याणी, महापराक्रमी, महान योध्दा आणि कर्तव्य निष्ठावान राजा होते. हैह्यवंशिय महाराज कार्तवीर्य अर्जुन (सहस्त्रार्जुन) यांची पुजा सप्तमीला दिपोत्सवा प्रमाणे साजरी केली जाते. त्याचप्रमाणे हा जन्मोत्सव इतिहास, उमंग, गुनगान आणि महाराजांची अपार महिमा याला जन्मोत्सवाच्या निमित्ताने अनेक राज्यांत व शहरात मोठ्या उत्साहाने शोभायात्रा काढुन साजरी केली जाते.दरवर्षी कार्तिक मास शुक्ल पक्ष सप्तमी या तीथीला सहस्त्रार्जुन जन्मोत्सव मोठ्या धुमधडाक्यात व थाटात साजरा करुन अनेक ठीकाणी मोठ–मोठी झांकीयासुध्दा शोभायात्रेच्या रूपात आपल्याला पाहायला मिळते. पौराणीक ग्रंथ व पुराणांनुसार कार्तवीर्य अर्जुन (सहस्त्रार्जुन) यांना हैह्याधिपति, दषग्रीविजयी, सुदशेन, चक्रावतार सप्तद्रवीपाधि, कृतवीर्यनंदन, राजेश्वर इत्यादी अनेक नाव असल्याचे पुराणांमध्ये वर्णन आहे. सहस्त्रार्जुन यांनी आपल्या जिवनात अनेक युद्ध लढलेत.परंतु यात रावणासोबतचे युद्ध महाकाय युद्ध मानल्या जाते. भार्गव प्रमुख जमदग्नि ऋषि (परशुराम यांचे वडील) यांच्या सोबत कृतवीर्य यांच्यासोबत चांगले संबंध होते. भागवत पुराणांमध्ये सहस्त्रार्जुन महाराज यांची उत्पत्ती व जन्म कथेचे वर्णन पहायला मिळते. सहस्त्रार्जुन यांनी भगवान विष्णूची कठोर तपश्चर्या करून १० वरदान प्राप्त केले व चक्रवर्ती सम्राट ही उपाधी धारण केली.नर्मदा नदीच्या काठावर सहस्त्रार्जुन व लंकापती रावण यांच्यात घनघोर महाकाय युद्ध झाले. रावण जेव्हा सहस्त्रार्जुन सोबत युद्ध करायला पोहचले तेव्हा सहस्त्रार्जुने आपल्या हजार हातांच्या बळावर नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहाला रोखले. नंतर नर्मदा नदीचे पाणी एकत्र करून पाणी सोडले, ज्यामध्ये रावणासह संपूर्ण सेना नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहामध्ये वाहुन गेली. या पराजयानंतर रावण आगबबुला झाला व सहस्त्राजुनला युद्धासाठी पुन्हा ललकारले व रावण आणि सहस्त्रार्जुन यांच्यात पुन्हा घनघोर युद्ध झाले. या युद्धात रावणाचा पराजय झाला व रावणाला बंदी करण्यात आले.नंतर रावणाचे वडील महर्षि पुलत्स्य यांच्या मध्यस्थिने रावणाला सोडण्यात आले. रावण हे बालि, बलि आणि सहस्त्रार्जुन यांच्याशी युद्ध हारले. रावण जेव्हा बालि सोबत युद्ध करायला गेला तेव्हा बालि पुजा करीत होते. परंतु वारंवार बालिला युध्दासाठी ललकारल्याने बालि आगबबुला झाले अशा परिस्थितीत बालिने रावणाला आपल्या बाजुमध्ये दाबुन चार समुद्राची परीक्रमा केली. कारण बालि शक्तीशाली होते अशा प्रकारे रावणाची अनेकदा हार झाली.याच प्रकारे पाताळ लोकांचे राजा दैत्यराज बलि होते. रावण हे राजा बलि यांच्याशी युद्ध करण्यासाठी पाताळलोकात त्यांच्या महालात पोहचले व बलिला युद्धासाठी ललकारले अशा परिस्थितीत बलिच्या महालात खेळत असलेल्या मुलांनी रावणाला पकडून घोड्यांच्या तबेल्यात बांधून ठेवले. अशा प्रकारे याही ठिकाणी रावणाची हार झाली होती.अशाप्रकारे बालि, बलि आणि सहस्त्रार्जुन यांच्याशी रावणाला पराजय पत्करावा लागला. शेवटी प्रभु श्रीराममचंद्राने रावणाचा वध केला. सहस्त्रार्जुन यांचा समाजासाठी त्याग दानशुरपणा लौकिक आहे. सहस्त्रबाहु (सहस्त्रार्जुन ) महाराजांना जन्मोत्सवानिमित्त कोटी कोटी नमन!



सहस्त्रार्जुन महाराजांच्या जन्मोत्साचे (सप्तमी) औचित्य साधून भाविकांनी, समाजबांधवांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरणाला वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण आपण लावलेल्या प्रत्येक वृक्षाच्या पाण्यात, फुलात, फळात, जळा– मुळात सहस्त्रार्जुन महाराजांचे दर्शन अवश्य होईल व संपूर्ण सृष्टी हिरवीगार होईल आणि संपूर्ण भारतवर्षात सहस्त्रार्जुन महाराजांचा जयजयकार सर्वत्र दिसून येईल.जय सहस्त्रार्जुन महाराज!

# विद्यार्थी दिन



श्याम ठाणेदार
पुणे



७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

◆◆

# मनाला मोहून टाकणारी गावाकडील सकाळ...

**वाचकाचे पत्र...**

शहरात वास्तव्यास असताना भल्या सकाळी फिरायला जाणे हा अनेकांचा आवडता छंद झाला आहे. आरोग्याच्या दृष्टीने हा छंद खूप चांगला आहे. सकाळचा शीतल वारा अंगाला झोंबला की शरीरात नवचैतन्य संचारते.सकाळी सुर्योदय होण्याच्या अगोदर वातावरणात जमिनीलगत ऑक्सिजनची मात्रा जास्त असते. त्यामुळे जे कोणी दररोज सकाळी न चुकता फिरायला जातात त्यांना फिरण्याचे फायदे ठाऊक असतात.

अनेक आजार बरे होतात किंवा गंभीर आजारांना नियंत्रित करता येते.शहरातले नोकरदार, व्यापारी व बैठे काम करणारे लोक हमखास फिरायला जातात आणि स्वतःला तंदुरुस्त ठेवतात.गावखेड्यात मात्र सकाळी कोणी फिरायला जात नाही.गावाकडे राहणारे फार कमी लोक सकाळी फिरायला जातात. दिवाळी सुट्टीत गावाकडे गेल्यावर मी व माझ्या भावांनी दररोज भल्या पहाटे गाव शिवारात फिरायला जाण्याचा आनंद लुटला.

गावाकडची सकाळ शांतीी,स्वच्छ, ताजी आणि मनमोहक असते.वारा हळुवार वाहतो.झाडांची पाने नकळत हालचाल करतात. जिकडे तिकडे झाडेच झाडे, लहानमोठे झुडपे, लतावेली, डोंगर दऱ्या आणि वेगवेगळे पक्षी पाहून मन कसे हरकून जाते. नदी आणि कालव्यातले थंडगार पाणी छानपैकी झुळझुळ वाहते.वारा अधूनमधून शीळ घालत असतो. पक्षी मंजूळ गाणी गातात. मध्येच मोराचा आवाज येतो. गोठ्यातली गाय वासराला पाहून हंबरते. कोंबडा जोऱ्याने बांग देतो आणि उठा उठा सकाळ झाली म्हणून सांगतो.अशा प्रसन्न सकाळी गावाकडच्या रस्त्यावर फिरायला जाणे म्हणजे जीवनातील एक अविस्मरणीय अनुभव असतो. गावाकडच्या रस्त्यावर वाहनांची रहदारी नसते आणि लोकांची वर्दळ ही नसते.म्हणून गावाकडे फिरायला जाणे एक सुवर्ण योग असल्यासारखे वाटते.

गावापासून तीन चार किलोमीटर अंतरावर फिरायला गेल्यावर एका सपाट जागेवर बसून निसर्गाच्या सान्निध्यात योगासने व प्राणायाम करताना विलक्षण आनंद मिळतो. पक्षांचा किलबिलाट ऐकून, आकाशात उंचावर उडणारे पक्षी पाहून आणि पूर्व दिशेचा सुर्योदय बघून मन प्रसन्न होऊन जाते. आकाशातील सप्तरंगी रंगछटा मनाला मोहून टाकतात. फुलांचे आकार व आकर्षक रंग पाहिले की वेगळीच मजा येते.विविधतेने नटलेले उंच व बुटकी झाडे पाहिली की पृथ्वीचा नजारा हृदयाच्या कोपऱ्यात आपोआप स्टोर केला जातो. आखाड्यावर खुंटीला बांधलेल्या बैलांच्या गळ्यातील घुंगुरांचा सुमधुर आवाज ऐकताना एक वेगळा असा विलक्षण आनंद मिळतो. अशा प्रसन्न सकाळी गावाकडे फिरायला जाणाऱ्यांची संख्या फारच कमी आहे ही एक खंत मनाला वाटत राहते. सकाळी फिरायला जाण्याचे महत्त्व गावात राहणाऱ्यांना अजूनही कळलेलं नाही किंवा दिवसभर अंग मेहनतीची कामे करणाऱ्यांना कशाला पाहिजे फिरायला असा गैरसमज रूढ झाला आहे. जेव्हा गावाकडच्या लहान थोर मंडळींना सकाळी फिरायला जाण्याचे महत्त्व कळेल तेव्हा शहरांप्रमाणे गावाकडेही लोक मोठ्या संख्येने सकाळी फिरायला घराच्या बाहेर पडतील.असे होणे मानव हिताचे असणार आहे एवढे मात्र नक्की.

**बबन गुळवे, उमरगा कोर्ट**

## (गुरुवचन)

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्याचवेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

## कराड शेती उत्पन्न बाजार समिती,कराड

### बाजार भाव

**बुधवार दि.६ नोव्हेंबर २०२४**

| | | | |
|---|---|---|---|
| **फळे** | | भोपळा- | ५० ते ८० |
| सिताफळ - | - | कारले- | २५० ते ३०० |
| चिकू - | २०० ते ३०० | फ्लॉवर- | २०० ते २५० |
| संफरचंद - | ८०० ते १५०० | कोबी- | १०० ते १५० |
| मोसंबी - | १००० ते १३०० | आले- | ३०० ते ५०० |
| डाळींब - | ८०० ते १००० | सूरळ- | - |
| केळी - | १०० ते १६० | हिरवी मिरची- | २०० ते ३०० |
| लिंबू - | - | शेवगा- | ७०० ते ९५० |
| **पालेभाज्या** | | चवळी शेंग | - |
| कोथंबीर - | ५०० ते १००० | भुईमुग शेंगा- | - |
| मेथी - | ४०० ते १२०० | पावटा- | ५०० ते ७०० |
| पालक - | ४०० ते ६०० | हिरवावाटाणा- | - |
| मुळा - | - | गवारी- | ३०० ते ४५० |
| तांदूळ - | - | घेवडा- | ४०० ते ४५० |
| शेपू - | ३०० ते ७०० | ढबू मिरची- | ३०० ते ३५० |
| **फळभाज्या** | | काकडी - | १०० ते १५० |
| दोडका - | ३०० ते ३८० | रताळ- | - |
| वांगी - | २५० ते ३०० | पडवळ- | २०० ते २५० |
| टोमॅटो - | १०० ते २०० | कांदा- | ३०० ते ५०० |
| भेंडी - | २०० ते ३०० | बटाटा- | २०० ते ३२० |
| दूधी - | १०० ते १५० | लसून- | २५०० ते २८०० |

टिप:- दर प्रति १० किलो/ शेकडा/ १० डझन

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ✻मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ✻ सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# आण्णांचा विचारांचा वारसाच आम्ही पुढे चालवितो

## संग्राम देशमुख :चिंचणी (अं) येथे कार्यकर्त्यांची बैठक संवाद

**कडेगांव/प्रतिनिधी:**
सर्व सामान्य जनतेला ज्ञात आहे. स्वर्गीय संपतराव देशमुख अण्णांनी मंत्रीपद नको पण टेंभू योजनेचा अट्टाहास धरला आणि तो पूर्ण केला. जि.प.अध्यक्ष असताना प्रत्येक गावाच्या विकासासाठी निधी देताना पक्षपात केला नाही म्हणून या भागाचा विकास झाला. त्यांच्या विचारांचा वारसाच आम्ही पुढे चालवित आहे. विकासासाठी राजकारणात न अडकता मला संधी द्या, असे आवाहन पलूस कडेगांव विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार संग्राम देशमुख यांनी केले.

ते चिंचणी (अंबक) या गावांमध्ये प्रचार दौऱ्या दरम्यान बोलत होते.यावेळी बिरोबा देवाचे दर्शन घेऊन अशीर्वाद घेतला.

यावेळी कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं) येथील काँग्रेस पक्षातील हणमंतराव तातोबा महाडीक सर यांनी संग्राम देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.यावेळी मारूती माने,रामचंद्र महाडीक, विश्वास भाऊ महाडीक, पांडूरंग होनमाने, माणिक माने, प्रमोद पाटील, प्रतिक्षा प्रदिप पाटील यांच्यासह कार्यकर्ते प्रचार दौऱ्यात सहभागी झाले होते.

यावेळी संग्राम देशमुख म्हणाले, मतदारसंघातील गेल्या अनेक वर्षापासून रखडलेली कामे मार्गी लागली. या मतदारसंघाचा पूर्वीचा इतिहास पाहिला तर पाण्याच्या प्रश्नासाठी संपतराव अण्णा देशमुख यांनी त्याग केला.टेंभू योजनेला गणपती दूध पितो असे म्हणणारेच आज ही ताकारी टेंभू योजनेचे श्रेय घेत आहेत. अण्णांनी एक वेगळ्या विचारांची माणसे एकत्र करून राजकारणामध्ये कर्तुत्वान माणसे उभी केली.

लोकहिताच्या अनेक योजना प्रभावीपणे राबविल्या आहेत. विकास साध्य करणे विकास पुढे नेऊन मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. ही निवडणूक परिवर्तनाची आहे. जनतेला पुन्हा महायुतीचे सरकार हवे आहे. या निवडणुकीत इतिहास घडवण्या साठी गट-तट विसरून ही निवडणूक मतदार संघातील प्रत्येकांची आहे असे समजून प्रयत्न करा. विकासाचा विजय आपल्या सर्वांच्या सहकार्याने करून दाखवू असा विश्वास संग्राम देशमुख यांनी व्यक्त केला.

यावेळी अभिजीत महाडीक म्हणाले, केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभाविपणे राबवून त्या आमलात आणल्या. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून संग्राम भाऊंनी आमदारांना जेवढा निधी आणता आला नाही एवढा भरघोस निधी उपलब्ध केला यासाठी भाऊंच्या रूपाने आणि स्वर्गीय आण्णांचा वारसा आपल्याला जपायला हवा. येणाऱ्या मतदानाला सर्वांनी एकजूट होऊन आपल्या स्वच्छ पारदर्शी नेत्याला विधानसभेवर पाठवू हा निर्धार पक्का करण्याचे आवाहन अभिजीत महाडीक यांनी केले.


चिंचणी (अं) येथील काँग्रेस पक्षातील हणमंतराव तातोबा महाडीक सर यांनी संग्राम देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी अॅड. प्रमोद पाटील म्हणाले, सत्ता असुदे किंवा नसूदे संग्राम भाऊ देशमुख सदैव आपल्या कार्यकर्त्यांच्या पाठीमागे खंबीर उभे असतात.इथून पुढे जर आपल्याला ह्याच्या पेक्षाही विकास हवा असेल तर आता एकत्रितपणे एक महत्त्वाचा निर्णय घ्यायचा आहे.संग्राम देशमुख भाऊ यांना निवडून द्या! विकास कामे करण्यासाठी त्यांच्यावर विश्वास ठेवावा.

यावेळी सचिन माने यांनी आभार मानले.यावेळी चिंचणी गावातील भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व सहकारी तसेच कार्यकर्ते, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कळंत्रेवाडीस तेजस्विनीताई घोरपडे यांची सदिच्छा भेट

## ग्रामस्थ भारावले;महिलांमध्ये उत्साह

**चाफळ/प्रतिनिधी:**
येत्या २० नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा नेते श्री संग्राम घोरपडे यांच्या पत्नी तसेच कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार मनोज दादा घोरपडे यांच्या वहिनी कराड उत्तरच्या स्वाभिमानी महिला सखी मंचाच्या अध्यक्षा सौ तेजस्विनीताई संग्राम घोरपडे यांनी कराड तालुक्यातील कळंत्रेवाडी गावातील शिवसेना शिंदे गटाचे उपशाखाप्रमुख मच्छिंद्र थोरात यांच्या घरी मंगळवार दिनांक ०५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास सदिच्छा भेट दिली.

यावेळी उपस्थित महिला ग्रामस्थांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. त्यामुळे महिला वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी उपस्थित महिलांनी गावातील विविध समस्या तेजस्विनीताईंसमोर मांडल्यानंतर येत्या काळात त्या शंभर टक्के सोडवण्याचे आश्वासन यावेळी सौ तेजस्विनीताई घोरपडे यांनी दिले.

दरम्यान, ग्रामस्थांनी दिलेल्या दिवाळी फराळ तसेच चहाचा आस्वाद उपस्थितांनी घेतला. यावेळी भाजपा महिला आघाडीच्या कराड उत्तर तालुका उपाध्यक्षा प्रतिभाताई कांबळे,साताऱ्याच्या सुनिता पवार, सावरघरच्या उज्वला बाबर, उंब्रजच्या शशिकला जाधव, वराडे गावच्या सुनिता साळुंखे, रामदास बाबर, शरद भोसले फौजी,अंकुश सप्रे, शुभम पवार, भाजपचे बुथ प्रमुख उपसरपंच दिलीप यादव, मच्छिंद्र थोरात, सुधाकर थोरात, विठ्ठल हजारे, सागर थोरात, सचिन थोरात तसेच गावातील महिला उपस्थित होत्या. प्रस्ताविक सचिन थोरात यांनी केले तर आभार उपसरपंच दिलीप यादव यांनी मानले.

# मी लंगोट बांधली आहे, उत्तम जानकर एक लाखापेक्षा जास्त मतांनी निवडून येतील

## जयसिंह मोहिते पाटील

**सोलापूर/प्रतिनिधी:**
माळशिरसच्या राखीव मतदार संघातील शरद पवार गटाचे उमेदवार उत्तमराव जानकर यांच्या प्रचाराचा नारळ (दि.४) रोजी अकलूज येथील शिवरत्न बंगल्यावर फुटला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील ,जयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह मोहिते व जानकर गटातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

दर निवडणुकीपूर्वी जयसिंह मोहिते पाटील हे माळशिरस तालुक्याचा विजयाचा आकडा प्रचाराच्या शुभारंभात जाहीर करतात. आजवर त्यांनी सांगितलेला आकडा चुकलेला नाही. मोहिते पाटलांचा एवढा पगडा माळशीरस या मतदारसंघावर आहे.




माळशिरस तालुक्यातील मोहिते पाटील व उत्तम जानकर हे दोन कट्टर विरोधक एकत्र लोकसभा निवडणुकीपूर्वी माळशिरस तालुक्यातील मोहिते पाटील व उत्तम जानकर हे दोन कट्टर विरोधक एकत्र आले होते. लोकसभेला मोहिते पाटील आणि विधानसभेला जानकर असा अलिखित करार या दोन गटात झाला होता. त्यानुसार उत्तम जानकर यांना शरद पवार गटाची उमेदवारी मिळताच अकलूजच्या परंपरेप्रमाणे शिवरत्न बंगल्यावर आज प्रचाराचा शुभारंभ झाला. यावेळी सर्वांचे लक्ष जयसिंह मोहिते पाटील हे कोणता आकडा सांगतात? याकडे होते.

मी आता लंगोट बांधली आहे, उत्तम जानकर हे एक लाख एक हजार मताने विजयी होतील

दरम्यान, जयसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या भाषणात माळशिरस मतदारसंघातून शरद पवार गटाचे उमेदवार उत्तम जानकर हे एक लाख एक हजार पेक्षा जास्त मताने विजयी होतील अशी घोषणा केली आहे. गेल्या निवडणुकीत मोहिते पाटलांच्या मदतीने विजयी झालेले भाजप आमदार राम सातपुते हे सध्या रिंगणात असून त्यांच्या गटाकडून आपल्या मागे अदृश्य शक्ती असल्याचा दावा केला जात होता. ती अदृश्य शक्ती म्हणजे मीच असल्याचे सातपुते यांचे म्हणणे असले तरी मी आता लंगोट लावली असून या वेळेला उत्तम जानकर हे एक लाख एक हजार मताने विजयी होतील, असा टोलाही जयसिंह मोहिते पाटील यांनी आमदार राम सातपुते यांना लगावला. ज्या पद्धतीने जयसिंग मोहिते पाटील यांनी निवडणुकीचा निकाल आज जाहीर केला त्याच पद्धतीने एक लाखापेक्षा जास्त मताने आपण विजयी होऊ आणि २३ चा गुलाल आपलाच असेल असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार उत्तम जानकार यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना केला.

# महायुती सरकारची विकास कामे घरोघरी पोहचवा

## पृथ्वीराज देशमुख यांनी सोनहिरा परिसरातील कार्यकर्ते यांना केले चार्ज

**कडेगांव/प्रतिनिधी:**
येणाऱ्या काळात महायुतीचेच सरकार सत्तेत येणार असून या साठी सर्व तरुण ,ज्येष्ठ कार्यकर्ते , महिलावर्ग यांनी महायुती सरकारची विकास कामे घरोघरी जाऊन पोहचवली तरच केलेल्या कामाचीच पोहचपावती मिळणार असल्याची भुमिका भाजपा माजी अध्यक्ष पृथ्वीराज देशमुख यांनी व्यक्त केले.

ते कडेगांव पलुस तालुक्यात भाजपाचे उमेदवार जि.प.माजी अध्यक्ष संग्राम देशमुख यांच्या प्रचार भेटीवेळी देवराष्ट्रे जिल्हा परिषद गट व चिंचणी पंचायत समिती गणातील प्रत्येक गावागावातून व वाड्यावस्त्यावरती जाऊन कार्यकर्तेंशी संवाद प्रसंगी बोलत होते.

पुढे पृथ्वीराज देशमुख म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून केलेल्या विकास कामे लाडकी बहीण योजना असेल प्रधानमंत्री जनधन योजना असेल नमो शेतकरी योजना असेल प्रधानमंत्री किसान योजना असेल अशा योजनांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार न करता थेट लाभार्थी पर्यंत पोहचण्याची भुमिका घेतली आहे तसेच इतर घटकासाठी घरकुल आवास योजना असेल शहरी ग्रामीण भागातील लोकांसाठी रमाई घरकुल योजना असेल या योजनेच्या माध्यमातून महायुती सरकारने काम केले आहे त्यामाध्यमातून दिन दलित वंचित उपेक्षित या घटकासाठी सुद्धा महायुती सरकारने काम केले आहे.


सोनकिरे ता.कडेगांव येथे कडेगांव पलुस तालुक्यात भाजपाचे उमेदवार जि.प.माजी अध्यक्ष संग्राम देशमुख यांचे प्रचार प्रसंगी पृथ्वीराज देशमुख यांनी भेट देताना सोबत कार्यकर्ते

पलुस कडेगांव मध्ये येणाऱ्या काळात महायुतीच्या व भारतीय जनता पक्षाच्या विचार पुढे घेऊन जाणाऱ्या नेतृत्वाची गरज असुन यावेळी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संग्राम देशमुख यांचे पाठीमागे कडेगांव पलुस मतदार संघातील जनतेने उभे राहण्याची गरज आहे. येणारा काळ भारतीय जनता पक्षाच्या विचारांचा आ.संपतरावजी देशमुख अण्णा यांच्यावरती प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या काळात त्यामुळे स्व.संपतरावजी देशमुख अण्णा यांनी बघितलेला स्वाभिमानी तालुके निर्माण करण्याचे स्वप्न साकार करणार असुन येणाऱ्या काळात विरोधकांना जनताच धडा शिकवुन स्वाभिमानी वृत्तीने मतदार बाहेर येऊन स्वाभिमानी मतदार संघ पलुस कडेगांव मतदार संघात बदल करतील अशी आशा पृथ्वीराज देशमुख यांनी व्यक्त केली.

यावेळी चिंचणी पंचायत गणातील भाजपा सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच सहकार्य वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वांच्या सहकार्याने ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी पार पाडावी

## निवडणूक निरीक्षक गीता ए

**कराड/प्रतिनिधी:**
२५९ कराड उत्तर व २६० कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील राजकीय पक्ष उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक कराड तहसील कार्यालयातील बैठक हॉलमध्ये संपन्न झाली. यावेळी भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक निरीक्षक गीता ए, सहाय्यक निवडणूक निरीक्षक राहुल घनवट, २५९ कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विक्रांत चव्हाण, २६० कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, नायब तहसीलदार युवराज पाटील उपस्थित होते. बैठकीस निरीक्षक गीता ए, निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे व विक्रांत चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त आणि पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी महत्त्वाचे असून सर्वांच्या सहकार्याने ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी पार पाडावी असे आवाहन करून ते म्हणाले, १० नोव्हेंबरला जिल्ह्यावरून सर्व मशीन्स कराड तालुक्यात दाखल होतील. त्या सर्व मशीन्स उमेदवार किंवा प्रतिनिधी व निवडणूक निरीक्षक यांच्यासमोर तपासण्यात येतील. त्याचवेळी कोणत्या केंद्रावर कोणत्या मशीन द्यायच्या याच्या जोड्या लावण्यात येतील. त्यानंतर ११, १२ व १३ नोव्हेंबरला बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट मशीन्स उमेदवारांची नावे व चिन्हांसह तयार करण्यात येतील.

ही सर्व प्रक्रिया उमेदवारांचे प्रतिनिधी पाहू शकतील. तसेच ज्या मशीन्स मतदानासाठी तयार केल्या आहेत, त्यापैकी कोणत्याही ५ टक्के मशीन्सवर १००० मते टाकून त्या योग्य आहेत का याची खातरजमा केली जाईल. फॉल्टी किंवा नादुरुस्त मशीन बाजूला काढून त्यांचे नंबर प्रतिनिधींना देण्यात येतील. आणि तयार मशीन्स स्ट्राँग रूमला इनकॅमेरा निगराणीखाली सुरक्षितपणे ठेवल्या जातील. मतदानादिवशी काही मशीन्स राखीव ठेवल्या असून अपवादात्मक ठिकाणी मशीनमध्ये तांत्रिक बिघाड उद्भवल्यास तिथे बदलण्यासाठी झोनल ऑफिसर व त्यांच्या स्टाफला



त्या मतदानादिवशी पहाटे चार वाजता ताब्यात दिल्या जातील. मतदानानंतर संध्याकाळी इनकॅमेरा सुरक्षिततेखाली स्ट्राँग रूमला ठेवल्या जातील व मतमोजणी दिवशी सकाळी ७ वाजता उघडल्या जातील. सुरुवातीला टपाली मतमोजणी होईल व त्यानंतर साडेआठ वाजता ईव्हीएम मशीन ची मतमोजणी सुरू होईल.

दरम्यान १३, १४ व १५ नोव्हेंबरला दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वृद्धांचे घरी जाऊन मतदान घेतले जाईल. यामध्ये मतदान अधिकारी व त्यांच्यासोबत उमेदवारांचे प्रतिनिधी असतील. त्यासाठी उमेदवारांनी अगोदर पोलिंग एजंट यांची यादी द्यावी. कराड उत्तर व दक्षिणमध्ये सुमारे ३५०० टपाली कर्मचारी असून निवडणूक आयोगाच्या बदलानुसार टपाली मतदान हे नाव असले तरी २०२४ पासून त्यात बदल झाला असून मतपत्रिका टपालाने पाठवल्या जात नाहीत तर त्या निवडणूक निर्णय अधिकारी उपलब्ध करून देतात. व कर्मचाऱ्यांचे मतदान कार्यालयीन वेळेत घेतले जाते. कराड उत्तर साठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सैदापूर व नगरपालिका शाळा कराड तर दक्षिण साठी श्री. शिवाजी विद्यालय कराड या ठिकाणी मतदान केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

निवडणूक निरीक्षक गीता ए म्हणाल्या, आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे. कोठे काही अनुचित प्रकार किंवा चुकीचे काही घडत असेल तर थेट माझ्या ८१४९२२३६३२ या भ्रमणध्वनी क्रमांकाला तत्काळ माहिती द्यावी, अथवा शासकीय विश्रामगृह कराड येथे भेटावे. संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. कराड दक्षिणचे निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे व कराड उत्तरचे निवडणूक निर्णय अधिकारी चव्हाण विक्रांत चव्हाण म्हणाले, राजकीय परिपक्व असलेला हा जिल्हा आहे. त्यामुळे संवेदनशील मतदान केंद्रे कुठेही नाहीत. लोकसभेचा हाच इतिहास विधानसभेलाही सर्वांनी दाखवून द्यावयाचा आहे. दरम्यान १८ नोव्हेंबरला सायंकाळी ६ वाजता प्रचार थांबेल. त्यानंतर कुठेही सार्वजनिक प्रचार करता येणार नाही अशाही सूचना यावेळी दोन्ही निवडणूक अधिकाऱ्यांनी उपस्थित राजकीय प्रतिनिधींना दिल्या.

# नेहरे बुरंबाळे येथील दुर्गम डोंगराळ भागातील लोंकांची दिपावली केली शिवम् कार्यकर्त्यांनी आंनददायी

**उंडाळे/प्रतिनिधी:**
शिवम प्रतिष्ठान घारेवाडी ता कराड च्या वतीने कोल्हापूर जिल्ह्यातील अतिदुर्ग असलेल्या शाहूवाडी तालुक्यातील नेहरे बुरंबाळे (धनगरवाडा) ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर येथील दुर्गम डोंगराळ भागातील लोंकांचीआंनददायी दिपावली शिवम् कार्यकर्त्यांनी केली.

शिवम प्रतिष्ठाण घारेवाडी ता कराड गेले ११ वर्षे देणे आनंदाचे' हा दिवाळी उपक्रम इंद्रजीत देशमुख प्रेरणेने राबवत आहे

यावर्षी शाहूवाडी तालूक्यातील नेहरे बुरंबळे धनगरवाडा या दुर्गम भागातील लोकांची दीपावली आनंददाई करण्याचा निर्णय प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी घेतला. त्यानंतर प्रतिष्ठानच्या कार्यकर्ते धनगरवाडा येथील स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन उंडाळे ता. कराड येथील सुहास पाटील सुनील शेवाळे साळुंखे सर यांनी अत्यंत दुर्गम असलेल्या धनगरवाडा येथे दहा ते पंधरा किलोमीटर पायी अंतर जंगलातून तुडवत जाऊन सर्वे या



गावाची माहिती घेतली व दीपावलीच्या दिवशी या गावातील लोकांना फराळ, नवीन कपडे शालेय साहित्य यासह वस्तूंचे वाटप केले . त्यामुळे या लोकांच्या चेहऱ्यावर दीपावलीच्या निमित्ताने आनंदाचे तेज फुलले होते.

प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी एका टेम्पोमध्ये संपूर्ण साहित्य भरून घरोघरी शिवमचे आकाश दिवे, दिवाळी फराळ सुगंधी उटणे पणत्या साबण तेल, मिठाई, याच बरोबर शालेय विद्यार्थ्यांना वह्या पेन, पुस्तके व नवीन कपडे देण्यात आली. प्रत्येक घरी १ टॉवेल देण्यात आला.

दुर्गम भागातील लोबेच्या गरजा मर्यादीत, जंगली प्राण्यामुळे शेतीचे दरवर्षी घेणारे नुकसान, रस्त्यांची गैरसोच लाईट गैरसाय यासह असंख्य अडचणीत सुध्दा ही माणसे कशी राहतात हे पाहू. अनेकांच्या पापण्यांच्या कडा ओलावल्या

यासाठी शिवम प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. संस्थेचे अध्यक्ष राहुल पाटील उपाध्यक्ष महेश मोहीते सचिव प्रताप भोलले यांच्या मार्गदर्शना खाली दिवाळी भेट गरजू लोकांपर्यंत पोहोच करणेत आली.

# सोलापूर जिल्ह्यात महाविकास आघाडीत बिघाडी

## दोन्ही खासदार ऐकमेकांविरोधात प्रचारात उतरले; प्रतिष्ठा पणाला

**सोलापूर/प्रतिनिधी:**
सोलापूर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे दोन्ही खासदार एकमेकांविरोधात प्रचारात उतरले आहेत. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांनी माचनूर येथील महादेव मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ केला आहे. सद्या दोन खासदार एकमेकांच्या विरोधात प्रचार करु लागल्या मुळे सोलापूर जिल्हयात आघाडीत बिघाडी झाली आहे.

भाजप राहिली बाजूला, काँग्रेस अन् राष्ट्रवादी काँग्रेस मध्येच भांडणं लागली असून धैर्यशील मोहिते-पाटलांनी आज पंढरपूर येथे भालकेंवर जोरदार तोफ डागली आहे.

विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार ) आणि काँग्रेसमध्ये मैत्रीपूर्ण लढत होत आहे. दिवंगत भारत भालके यांचे पुत्र भगीरथ भालके यांना काँग्रेसनं तिकीट दिलं आहे.

यावेळी सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या विराट सभेची सुरुवात झाली. तर दुसरीकडे कालच संध्याकाळी महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचाराचा शुभारंभ माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते याच ठिकाणी



झाला होता.

काल धैर्यशील मोहिते पाटील यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचे नाव न घेता गद्दाराला जनता धडा शिकवेल असा टोला लगावला होता. यावर आज प्रणिती शिंदे आणि भगीरथ भालके काय उत्तर देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मंगळवेढा तालुक्यातील अतिशय पुरातन असणाऱ्या माचनूर येथील महादेव मंदिरात सर्व प्रमुख उमेदवारांनी प्रचाराचा नारळ फोडल्याने माचनुर चा महादेव कोणाला पावणार याचीही चर्चा मतदारसंघात रंगू लागली आहे. याच ठिकाणी भाजपचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांनी दोन दिवसांपूर्वी प्रचाराचा शुभारंभ केला होता तर काल राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या अनिल सावंत यांचा येथेच शुभारंभ झाला होता.

दरम्यान, तिन्ही उमेदवारांनी केलेल्या शक्ती प्रदर्शनामुळे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची निवडणूक रंगतदार होणार आहे. या ठिकाणी महाविकास आघाडीत झालेली बिघाडी कोणाला फायदेशीर ठरते यावर येथील निकाल अवलंबून असणार आहे. महाविकास आघाडीतील लोकसभेला एकत्र असलेले माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे अनिल सावंत यांच्या प्रचारासाठी तर सोलापूर लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे या भगीरथ भालके यांच्या प्रचाराला आल्याने जिल्ह्यातील दोन्ही खासदार विधानसभेला एकमेकांच्या विरोधात असल्याचे चित्र तयार झाले आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील लढत रंगतदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महायुतीकडून विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना संधी देण्यात आली आहे. तर महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. सुरुवातील काँग्रेसने भगीरथ भालके यांनी तिकीट जाहीर केलं होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटानं अनिल सावंत यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळं आता पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# जनतेच्या पाठबळावर विजय निश्चित:आ.ऋतुराज पाटील

**कोल्हापूर/प्रतिनिधी:**
कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार ऋतुराज पाटील यांच्या गिरगावमधील पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, महिलासह जनतेचे आशीर्वाद व पाठबळावर माझा विजय निश्चित आहे असा विश्वास आमदार ऋतुराज पाटील यांनी व्यक्त केला.

आमदार ऋतुराज पाटील यांनी सैनिकांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिरगाव मधील श्री भैरवनाथ मंदिरात दर्शन घेऊन पदयात्रेला प्रारंभ केला. गावातील प्रमुख मार्गावरून पदयात्रा काढण्यात आली. यावेळी आ.पाटील यांचे ठिकठिकाणी उत्साही स्वागत करण्यात आले.

आमदार ऋतुराज पाटील म्हणाले, देशसेवेसाठी गिरगावने दिलेले योगदान अतुलनीय आहे. आजी माजी सैनिकांचे शौर्य आणि कार्य वंदनीय असून



आम्ही कायम त्यांच्या ऋणात राहू. महिला, युवक, जेष्ठ नागरीक व विद्यार्थी या सर्वांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. गेल्या पाच वर्षात गावच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी खेचून आणला. या निधीतून विकासात्मक काम गावात झाले आहे. गेली पाच वर्ष कार्यकर्त्यांच्या ताकतीवर चांगले काम केल्याचे समाधान आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास व बळ आपल्या पाठीशी कायम राहिल. पदयात्रेला मिळालेला प्रतिसाद हा माझ्या विजयाचा पाया आहे.

पदयात्रेत सरपंच महादेव कांबळे, उपसरपंच उत्तम पाटील, उत्तम पाटील-नवाळे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, संभाजी कोंडेकर, राजेंद्र कोंडेकर, चंद्रकांत कुरणे, श्रीकांत बागणे, अनिल म्हेत्रे, अनिल चव्हाण, पांडुरंग पाटील, शशिकांत साळुंखे, रघुनाथ पाटील, राजाराम चव्हाण, दत्ता साळुंखे, सुभाष पाटील, गावातील महादेव तालीम, शिवाजी तालीम, जय हनुमान तालीम, पॉवर ग्रुप, बालगोपाल तालीम, जय शिवराय, द ग्रेट मराठा, जय हिंद, हिंदुस्तान ग्रुप, या मंडळाचे कार्यकर्ते तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मारहाण प्रकरणी सहाजणांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**
वडूथ ता.सातारा गावच्या हद्दीत हॉटेलमध्ये धक्का लागल्याच्या कारणातून सहा जणांनी मारहाण केल्याप्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अमित साबळे, विजय साबळे, मयुर साबळे, प्रतीक पोतदार, सौरभ साबळे, अभिजीत साबळे (सर्व रा.शिवथर ता.सातारा) यांच्या विरुध्द मंगेश श्रीरंग कदम (वय ४६, रा. बसाप्पाचीवाडी ता.सातारा) यांनी तक्रार दिली आहे. दि. ५ नोव्हेंबर रोजी ही घटना घडली असून लाकडी दांडक्याने मारहाण केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या कार्याचे प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांच्याकडून कौतुक

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली, त्यांनी महाविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. दीपावलीच्या सुट्टीचे औचित्य साधून डॉ प्रमोद पाटील सहकुटुंब अक्कलकोट येथे दर्शनाच्या निमित्ताने आले होते, त्यावेळी त्यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.

महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. यावेळी ते म्हणाले की, सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणे हे तसे भाषिक दृष्ट्या कठीण कार्य असते तरीसुद्धा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील शिक्षक दर्जेदार पद्धतीने अध्यापनाचे काम करत आहेत. व्यवस्थापन परिषदेची त्यांना साथ मिळते ही बाब कौतुकास्पद आहे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकासात महाविद्यालयाने दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर सेवकांना त्यांनी दीपावली सणाच्या शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आ. सचिन दादा कल्याणशेट्टी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख डॉ विकास पाटील, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी संस्थेच्या वतीने प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांना शुभेच्छा दिल्या..


कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ प्रमोद पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

